**ध. मा. कानेड,**
**अवर सचिव**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

**अ.शा.प.क्रमांक-रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र. ७/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २१ जानेवारी,२०१२.**

**निवडणूक प्राथम्य**

आदरणीय महोदय,

आपणास विदित आहेच की २५ जानेवारी हा **'राष्ट्रीय मतदार दिवस'** म्हणून साजरा केला जातो. मुख्य निवडणूक आयुक्त यांच्याकडून दरवर्षी याबाबत सर्व जिल्ह्यांकडून नवीन मतदारांना आवाहन करण्यासाठी कार्यक्रमही आयोजित केले जातात. यावर्षी २५ जानेवारी हा 'मतदार दिवस' निवडणुकीच्या काळात आलेला असून त्याचा चांगला उपयोग आपल्याला मतदार जागृतीसाठी करता येईल.

त्या दिवशी आपण आपल्या जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था तसेच सामान्य नागरिकांच्या दक्षता समित्यांची मदत घेऊन आगामी निवडणुकीत पैसे व दारू यांचा वापर होऊ नये यासाठी जनजागृती अभियान सुरू करावे. हा कालावधी एक सप्ताहाचा असावा. या अभियानांतर्गत खालीलप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी :-

(अ) राज्य निवडणूक आयोगाने मतदार जागृती अभियानांतर्गत तयार केलेल्या सीडी त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून (मतदानाचा दिवस, निवडणूक शाखेचे दूरध्वनी क्रमांक) स्थानिक केबल टीव्हीवरून प्रसारित करावेत व इतर प्रसार माध्यमांद्वारेही व्यापक प्रसिद्धी द्यावी.

(ब) मतदारांना आवाहन करणारे फलक लावण्यात यावेत.

आगामी निवडणुकीमध्ये विविध प्रलोभनांचा वापर करून सर्रासपणे मतदारांवर दबाव आणण्याचे प्रयत्न उमेदवारांकडून तसेच राजकीय पक्षांकडून करण्यात येत आहेत. अश्या अनेक तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे येत आहेत. निवडणुका भयमुक्त व स्वच्छ वातावरणात पार

पाडण्याच्या दृष्टीने एक सकारात्मक संदेश जनतेपर्यंत पोचावा याकरिता हे अभियान घ्यावे व केलेल्या अभियानाची माहिती तसेच व्हिडीओ शूटिंग आयोगास त्वरीत पाठवून दयावे.

आपला स्नेहांकित,



( ध. मा. कानेड )

श्री. नांवाने,
जिल्हाधिकारी,
जिल्हा----------------

महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड,
सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर